# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर



**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०५.०५.२०२६**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (२९.०४.२०२६ ते ०५.०५.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०६.०५.२०२६ ते १०.०५.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | दिनांक | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ४ | ८ | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ४० | ४० | ४० | ३९ | ३९ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २३ | २४ | २५ | २५ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ० | १ | ४ | ४ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७८ | ७२ | ६६ | ६० | ५७ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३३ | ३१ | ३५ | ३५ | ३५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ९ | ७ | ६ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प. | वा. | वा. | वा. | उ.वा. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये ६ व ७ मे रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची तसेच ८, ९ व १० मे रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **सातारा जिल्ह्यामध्ये ८ व ९ मे रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये १० मे पर्यंत कमाल तापमान ३९.० ते ४०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २३.० ते २५.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.** सकाळची सापेक्ष आद्रता ५७ ते ७८% या दरम्यान, दुपारची सापेक्ष आद्रता ३१ ते ३५% या दरम्यान राहण्याची तसेच वाऱ्याचा वेग ताशी ५ ते ०९ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १० ते १६ मे दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | | सातारा जिल्ह्यामध्ये व घाट भागात ८ मे रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ४० ते ५० किमी वेगाच्या वाऱ्यासह मध्यम पावसाची शक्यता आहे |
| सामान्य सल्ला | | **शेतकरी बांधवांनी उष्णतेपासून बचावासाठी खालीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>❖ **कामाच्या वेळा:** दुपारच्या कडक उन्हात (दुपारी १२:०० ते ४:०० दरम्यान) शेतात काम करणे टाळावे.<br>❖ **पेहराव:** हलके, सैल आणि सुती कपडे परिधान करावेत.<br>❖ **संरक्षण:** डोक्याचे संरक्षण करण्यासाठी टोपी किंवा सुती रुमालाचा वापर करावा.<br>❖ **पेय:** भरपूर पाणी प्यावे. याशिवाय ताक किंवा लिंबू पाणी नियमित घ्यावे.<br>❖ **विश्रांती:** थेट सूर्यप्रकाशात सतत काम करू नका; मधूनमधून सावलीत विश्रांती घ्यावी.<br>❖ **आरोग्याची लक्षणे:** जर तुम्हाला चक्कर येणे, डोकेदुखी किंवा अशक्तपणा जाणवत असेल, तर त्वरित थंड ठिकाणी जाऊन विश्रांती घ्यावी.<br>❖ **ताण कमी करणे:** शरीरावरील उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी अधूनमधून चेहऱ्यावर आणि शरीरावर पाण्याचे हबके मारावेत.<br>❖ **टाळावे:** मद्यपान करणे टाळावे, कारण मद्यामुळे शरीरातील उष्णतेचा ताण वाढतो. |
| संदेश | | कमाल तापमानामध्ये वाढ होण्याची असल्याने शक्यता असल्याने शेतकरी बंधूंनी स्वत:ची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी |
| मका | वाढीची | ➢ मका पिकास पुरेसे पाणी द्यावे.<br>➢ शक्य असल्यास ओलावा टिकवण्यासाठी आच्छादन करावे.<br>➢ दुपारी कडक उन्हात .फवारणी टाळावी (४ ते १२)<br>➢ ताण असल्यास १पोटॅशियम नायट्रेट %ची फवारणी करावी.<br>➢ लष्करी अळीच्या प्रादुर्भावर लक्ष ठेवावे. |
| भुईमुग | वाढीची | ➢ उन्हाळी हंगामात रोग व किडींचा प्रादुर्भाव आढळतो. भुईमुगाच्या पिकावर मावा, फुलकडे, तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसतात ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझेंडिरॅक्टीन २ मिली/लि पाणी या प्रमाणात करावी दुसरी फवारणी १५ दिवसांनी द्यावी किंवा डेकामेथ्रिन ५०० मिली किंवा मेटॅसिस्टॅिक्स कोणत्याही कीटकनाशकाची प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून फवारणी करावी. रस शोषणाऱ्या किडींसाठी पिवळे चिकट सापळे एकरी १५ व निळे चिकट सापळे एकरी ५ या प्रमाणात लावावे.<br>➢ जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाणी द्यावे |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ **हुमणी :** वळवाचा पहिला पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सायंकाळी बाभूळ, कडूनिंब, व बोर या झाडांवर जमा होतात. आगोदर मादी भुंगेरे व त्यानंतर नर भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या झाडांवर बसून ते झाडांचा पाला खातात. अश्या झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकूण त्यांचा नाश करावा.<br>➢ उष्ण हवामानामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढतो आणि पिकावर ताण येतो, ज्याचा परिणाम वाढीवर आणि उत्पादनावर होतो. त्यामुळे जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी हलके आणि वारंवार पाणी द्यावे.<br>➢ सकाळी (८-६) किंवा संध्याकाळी (९-६) दरम्यान पाणी द्यावे. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ➢ जमिनीमध्ये ओलावा टिकवण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा.<br>➢ दुपारी कडक उन्हात .फवारणी करणे टाळावे (४ ते १२) |
| टोमॅटो | वाढीची | ➢ सकाळी (८-६) किंवा संध्याकाळी (९-६) दरम्यान पाणी द्यावे.<br>➢ जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आणि जमिनीतील बाष्पीभवनाचा वेग कमी करण्यासाठी टोमॅटो पिकामध्ये आच्छादन (मल्चिंग) करावे. |
| वांगी | फुलोरा ते फळ वाढीची | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान राहिल्यामुळे वांगी पिकावर कोळी किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे . प्रादुर्भाव दिसून येताच हेक्झीथायझोक्स ५.४५ ई.सी १० मिली. १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| काकडी | वाढीची | ➢ दररोज किंवा एक दिवसाआड ठिबक सिंचनाचा वापर करावा.<br>➢ बाष्पीभवन कमी करण्यासाठी प्लास्टिक मल्चिंगचा वापर करावा.<br>➢ अति उष्णतेमध्ये ३५%५०- शेडनेटची सोय करावी.<br>➢ कोळी आणि पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवावे. |
| आंबा | फळ पक्वता | ➢ आंबा पिकामध्ये तयार झालेली फळे नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेली फळे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.<br>➢ उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी आणि फळांमध्ये साका तयार होण्याचे टाळण्यासाठी काढलेली फळे सावलीत ठेवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. |
| कलिंगड | वाढीची | ➢ उष्णतेमुळे फळांना तडे जाणे टाळण्यासाठी ओलावा कायम समान ठेवावा.<br>➢ मल्चिंगचा वापर करावा.<br>➢ वारंवार पाणी द्यावे, परंतु पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी.<br>➢ फळांचे कडक उन्हापासून संरक्षण करावे. |
| आले | लागवड | ➢ आले लागवड १५ एप्रिल पासुन ते जुनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करावी.<br>➢ लागवडीसाठी वरदा, रिजाथा, माहिम, महिमा यासुधारीत जातींची निवड करावी.<br>➢ कंद ४ ते ५ सें.मी. खोल लावावेत. कंद पुर्ण झाकले जातील याची दक्षता घ्यावी. आल्याला मध्यम प्रकारची सुर्यप्रकाशाची आवश्यकता असते.<br>➢ जमिनीच्या उताराप्रमाणे लागणीची पध्दत निश्चित करुन जमिनीवर उताराच्या दिशेने बेड उठवून घ्यावेत. बेड एकसारखे सपाट होतील याची काळजी घ्यावी.<br>➢ बेड तयार करताना ट्रॅक्टरच्या फनपाळयाचे सरळ बेड तयार करावे. लागणीचे वेळी आढीत ठेवलेले बियाणे बाहेर काढून त्याचे एकसारखे तुकडे करुन (मोड) घ्यावेत.<br>➢ आल्याचा तुकडा ज्या दिवशी जमिनीत पुरला जाईल त्याच दिवशी त्या जमिनीस भरपूर पाणी मिळालेच पाहिजे. पाणी जमिनीस एवढे द्यावे किमान लावलेल्या तुकड्याच्या खाली चार ते पाच इंच संपूर्ण ओल गेलेली असावी. अन्यथा दुसऱ्या दिवशी पुन्हा तेवढेच पाणी द्यावे. व त्यानंतरच्या पाण्याच्या पाळया जमिनीच्या प्रतवारीनुसार एक दिवसा आड एक दिवस किंवा दोन आड एक दिवस अशी ओल कायमस्वरुपी राखून ठेवली जाईल एवढेच पाणी द्यावे.<br>➢ लागणीपासून आठ दिवसांनी हलकी भर टाकावी, कारण लागणी वेळी लांब तुकड्याची टोके जमिनीच्या पृष्ठभागाबरोबर असतात. त्यास उष्णतेची झळ लागू नये किंवा उघडे असणारे डोळे खराब होऊ नयेत म्हणून या भरीची आवश्यकता आहे.<br>➢ लागवड केल्यानंतर जमिनीचे तापमान सिंचन देऊन नियंत्रित करणे गरजेचे आहे. जमिनीचे तापमान बाहेरील वातावरणाच्या तुलनेत जास्त असते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे बेण्यातील ओलावा टिकवुन ठेवणे आवश्यक आहे. बेण्यातील ओलावा कमी झाल्यास उगवण शक्ती व येणाऱ्या फुटव्यावर परिणाम होतो. |
| पशुधन | वाढीची | ➢ मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जनावरांना जंतनाशक औषध पाजावे व शेवटच्या आठवडयात लाळखुरकत, फ-या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात.<br>**निवारा आणि व्यवस्थापन:**<br>❖ जनावरांना सावलीत किंवा हवेशीर गोठ्यात ठेवावे. गोठ्यात खेळती हवा राहील याची खात्री करावी.<br>❖ गोठ्यामध्ये पंखे किंवा 'फॉगर' वापरून तापमान कमी ठेवावे.<br>• **चराई आणि काम:**<br>❖ दुपारच्या कडक उन्हात (सकाळी ११ ते संध्याकाळी ५) जनावरांना चरायला नेणे पूर्णपणे टाळावे.<br>❖ शेतीची कामे किंवा जनावरांची ने-आण सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा करावी.<br>• **पाणी आणि आहार:**<br>❖ जनावरांना स्वच्छ, थंड आणि मुबलक पाणी उपलब्ध करून द्यावे.<br>❖ भूक टिकवून ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी किंवा पहाटे हिरवा चारा द्यावा.<br>• **उष्माघातावरील उपचार**<br>❖ **प्राथमिक उपचार:** उष्माघात झाल्यास जनावराला तातडीने थंड व सावलीच्या ठिकाणी हलवावे.<br>❖ **थंडावा:** जनावराच्या दोन्ही शिंगांच्या मध्ये थंड पाण्यात भिजवलेला कापड किंवा पोते बांधावे आणि ते सतत ओले ठेवावे. संपूर्ण शरीरावर ओले पोते टाकावे.<br>❖ **खाद्य:** पचण्यास हलके अन्न द्यावे. पाण्यात गूळ किंवा साखर मिसळून पिण्यास द्यावे जेणेकरून जनावराला ऊर्जा मिळेल. |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | ➢ **वैद्यकीय मदत:** त्वरित पशुवैद्यांशी संपर्क साधावा आणि त्यांच्या सल्ल्यानुसार उपचार करावेत. |
| पोल्ट्री पक्षी | वाढीची | पोल्ट्रीमधील पक्षांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पोल्ट्रीच्या बाजूने बारदाणे लावावेत व त्यावर वारंवार पाणी शिंपडावे जेणेकरून आतील तापमान कमी राहण्यास मदत होईल.तसेच पोल्ट्रीमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी . |

| मेघदूत | दामिनी |
|---|---|
| ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ०५.०५.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**